वर्ष : ०५ | अंक: ०४ | मुंबई, मंगळवार १८ डिसेंबर २०१८ ते २४ डिसेंबर २०१८ | पृष्ठ: ४

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

# पोलीस बातमी पत्र

POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

Website: www.policebatmipatra.com www.policebatmipatra.in

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक



PG 2 दहिसर ते वांद्रे कांदळवन क्षेत्र होणार झोपडीमुक्त

3 → लोकशाहीच्या मोदीकरणाला मतदारांचा शह

आता ओला-उबेरप्रमाणे ॲम्ब्युलन्सही बुक करता येणार ← 4




# मोदीनंतर अमित शहा मुंबईत

## पराभवानंतर 'हा' आहे नवा मास्टरप्लॅन

**मुंबई- सुप्रीम कोर्टाने राफेल प्रकरणाबाबत आपला निर्णय दिल्यानंतरही या प्रकरणाबाबतचा वाद थांबताना दिसत नाही. कारण आता कोर्टात सादर केलेल्या शपथपत्रात 'टायपिंग मिस्टेक' असल्याचं केंद्र सरकारने म्हटलं आहे. यावरून सामनातून मोदी सरकारवर निशाणा साधण्यात आला आहे.**

बंद लिफाफ्यात सरकारने राफेल सौद्याबाबत जी माहिती न्यायालयासमोर आणली त्यावर अवलंबून राहून न्यायालयाने आपले मत मांडले (निकाल नाही), पण बंद लिफाफ्यातील माहिती 'अर्धसत्य' होती व न्यायालयाने काहीतरी चुकीचा अर्थ घेतला आहे असे आता मोदी सरकारला सांगावे लागले हे धक्कादायक आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाचे हसे झाले. मोदी सरकार उघडे पडले व 'ठग्स ऑफ हिंदुस्थान' हा पडलेला सिनेमा दिल्लीत पुन्हा झळकला. 'चौकीदार चोर है' असे श्री. राहुल गांधी अलीकडे सांगत आहेत, पण चौकीदारांच्या मंडळींनी न्यायालयात शपथेवर खोटे सांगून 'राफेल' निर्णयात क्लीन चिट मिळविण्याचा प्रयोग केला व तो त्यांच्यावर उलटला. ३६ राफेल विमानांच्या खरेदीत काही अनियमितता झाली काय, राफेल विमानांच्या किमती अचानक शंभर पटीने वाढवून कोणत्या उद्योगपतीचा फायदा झाला याची चौकशी व्हावी इतकीच मागणी याचिकाकर्त्यांनी केली व ती योग्यच होती. 'सरकारने न्यायालयास फसवले?' की 'न्यायालयाने देशाला फसवले?' हे दोन प्रश्न निर्माण झाले. बोफोर्स प्रकरणात सुरुवातीस लपवाछपवी झाली व नंतर सगळ्याच नाड्या सुटल्या. राफेलबाबत नेमके तेच घडत आहे.






# पोलीस उपनिरीक्षकाच्या बँक खात्यातून १२ लाखांची रोकड लांबविली

## मोबाइल क्रमांकात बदल करून फसवणूक

**नाशिक : त्र्यंबकरोडवरील महाराष्ट्र पोलीस अकादमीतील प्रशिक्षणार्थी पोलीस उपनिरीक्षकाच्या बँक खात्यातून सव्वादोन वर्षांच्या कालावधीत ११ लाख ९० हजार रुपये परस्पर काढून घेत फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या फसवणुकीत महाराष्ट्र पोलीस अकादमी वा आयडीबीआय बँकेतील कर्मचाऱ्याचा सहभाग असल्याचा संशय गंगापूर पोलिसांनी व्यक्त केला असून, याप्रकरणी फसवणूक व अपहाराचा गुन्हा दाखल केला आहे.**

गंगापूर पोलीस ठाण्यात भरत केशवराव हुंबे (रा. नांदूर नाका रोड) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार महाराष्ट्र पोलीस अकॅडमीत अडीच ते तीन वर्षांपूर्वी दुष्यंत दादासाहेब पाटील हे प्रशिक्षणार्थी पोलीस उपनिरीक्षक म्हणून नियुक्तीस



होते. काही महिन्यांपूर्वीच पोलीस खात्यातील नोकरी सोडलेल्या पाटील यांचा त्यावेळचा दरमहा पगार व इतर भत्ते त्यांच्या आयडीबीआय बँकेतील सेव्हिंग खाते क्रमांक ०१०३१०४०००२७४१११ मध्ये जमा होत होता.

पोलीस उपनिरीक्षक पाटील हे एमपीएतील नोकरी सोडून गेलेले असल्याने आपली फसवणूक झाल्याचे बऱ्याच कालावधीनंतर त्यांच्या लक्षात आले. एमपीएममध्ये असताना दुष्यंत पाटील यांची कागदपत्रे व कार्ड तिथेच राहिले होते. याचाच गैरफायदा घेत रक्कम काढून घेत फसवणूक करण्यात आली आहे. यापद्धतीने आणखी पोलीस अधिकाऱ्यांची फसवणूक झाली आहे का, या दृष्टीनेही गंगापूर पोलीस तपास करीत आहेत.

### वेगवेगळ्या तारखेला काढली रक्कम

महाराष्ट्र पोलीस अकादमीतील संशयित अज्ञात लिपिक वा आयडीबीआय बँकेतील एखाद्या कर्मचाऱ्याने २८ एप्रिल २०१४ ते ८ ऑगस्ट २०१६ या कालावधीत अकादमीतील अहरण व संवितरण अधिकारी यांच्या खात्याचे चार चेकद्वारे ११ लाख ९० हजार ३६५ रुपयांची रक्कम दुष्यंत पाटील यांच्या खात्यावर बनावट कागदपत्र तयार करून ते बँकेत जमा करून मोबाइल क्रमांकात बदल केला. यानंतर वेळोवेळी डेबिट कार्डचा वापर करून वेगवेगळ्या तारखेला एटीएममधून रक्कम काढून घेत फसवणूक केली.

# मोदी सरकारमुळे पडलेला 'ठग्ज ऑफ हिंदुस्तान' सिनेमा पुन्हा झळकला



**मुंबई : 'राफेल प्रकरणात मोदी सरकार उघडे पडले व 'ठग्स ऑफ हिंदुस्थान' हा पडलेला सिनेमा दिल्लीत पुन्हा झळकला,' असं म्हणत शिवसेनेनं पंतप्रधान मोदींवर घणाघात केला आहे. राफेल प्रकरण सुप्रीम कोर्टात पोहोचल्यानंतर गेल्या काही दिवसांपासून गोंधळ सुरू आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेनेनं ही टीका केली आहे.**

सुप्रीम कोर्टाने राफेल प्रकरणाबाबत आपला निर्णय दिल्यानंतरही या प्रकरणाबाबतचा वाद थांबताना दिसत नाही. कारण आता कोर्टात सादर केलेल्या शपथपत्रात 'टायपिंग मिस्टेक' असल्याचं केंद्र सरकारने म्हटलं आहे. यावरून सामनातून मोदी सरकारवर निशाणा साधण्यात आला आहे. बंद लिफाफ्यात सरकारने राफेल सौद्याबाबत जी माहिती न्यायालयासमोर आणली त्यावर अवलंबून राहून न्यायालयाने आपले मत मांडले (निकाल नाही), पण बंद लिफाफ्यातील माहिती 'अर्धसत्य' होती व न्यायालयाने काहीतरी चुकीचा अर्थ घेतला आहे असे आता मोदी सरकारला सांगावे लागले हे धक्कादायक आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाचे हसे झाले.


उर्वरित पृष्ठ 2 वर


# अंधेरीतील कामगार रुग्णालयात आग

**भीषण दुर्घटनेत ३ जणांचा मृत्यू तर १०८ जण जखमी**



**मुंबई : अंधेरीतील कामगार रुग्णालयात आग लागून झालेल्या भीषण दुर्घटनेत ३ जणांचा मृत्यू तर १०८ जण जखमी झाले असून जखमींना विविध रुग्णालयांत दाखल करण्यात आले आहे.**

अंधेरी मरोळ भागात तळ अधिक पाच मजल्यांचं कामगार रुग्णालय असून सायंकाळी चार वाजताच्या सुमारास रुग्णालयाच्या चौथ्या मजल्यावर आगीचा भडका उडाला. आगीबाबत पावणेपाचच्या सुमारास अग्निशमन दलाला माहिती देण्यात आली. त्यानंतर तातडीने १० बंब, रेस्क्यू व्हॅन व अन्य सामग्रीसह अग्निशमन जवान घटनास्थळी दाखल झाले व दोन तासांच्या शर्थीच्या प्रयत्नांनंतर आग आटोक्यात आणण्यात यश मिळाले.

# अंगणवाड्यांमध्ये ८ लाख बनावट लाभार्थी

**नवी दिल्ली -** महाराष्ट्रातील एक लाखाहून अधिक अंगणवाड्यांमध्ये कमीत कमी ८ लाख बनावट लाभार्थी असल्याची माहिती केंद्रीय महिला आणि बालकल्याण मंत्रालयाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली आहे. महाराष्ट्रातील अंगणवाड्यांमध्ये एकूण ६१ लाख लाभार्थी आहेत. पण यातील ८ लाख लाभार्थी बनावट आहेत, असं अधिकाऱ्याने सांगितलं. लाभार्थी आधारशी जोडले गेल्याने बनावट लाभार्थ्यांचा पर्दाफाश झाला आहे. प्रत्येक मुलासाठी केंद्र सरकार दिवसाला ४.८ रुपये आणि राज्य सरकार ३.२ रुपये अनुदान देतं. यामुळे देशातील नोंदणीकृत अंगणवाड्यांमधील बनावट लाभार्थ्यांची ओळख करून त्यांना हटवण्याचं काम सुरू आहे, अशी माहिती अधिकाऱ्याने दिली.




असामध्येही सरकारने केलेल्या तपासणीत १४ लाख लाभार्थी बनावट आढळले होते. यानंतर लाभार्थ्यांची सत्यता तपासणीची मोहीम मंत्रालयाने हाती घेतली आहे. या तपासणीत आतापर्यंत उत्तर प्रदेशात १४ लाख बनावट लाभार्थी आढळलेत. तसंच मुलांच्या खाद्य पुरवठ्यात अनेक त्रुटीही असल्याचं महिला आणि बालकल्याणमंत्री मनेका गांधी यांनी मान्य केलंय. यामुळे राज्य सरकारांनी लाभार्थ्यांची तपासणी करावी, अशा सूचना मंत्रालयाने दिल्या आहेत.

# ठाणे येथे पोलीस मुख्यालयात पोलिसांसाठी आश्रय ट्रस्टतर्फे मोफत आरोग्य शिबिर संपन्न

## ठाणे ग्रामीण पोलीस अधिक्षक शिवाजी राठोड यांच्या सहकार्यामुळे शिबिरामध्ये ३०० पोलिसांचा उत्स्फुर्त सहभाग

### 'प्रत्येक पोलिसाला निरोगी रहायला पाहिजे'- पोलीस उपअधिक्षक शांताराम दळवी






आश्रय सामाजिकसांस्कृतिकशैक्षणिकट्रस्टच्या वतीने ठाणे पोलिस मुख्यालय, ठाणे ग्रामीण येथे शनिवार दिनांक१५.१२.२०१८ रोजी, पोलिसांसाठी मोफ्त शरीर तपासणी, नेत्र तपासणी, मधुमेह, हदय तपासणी, रक्तातील चाचण्या अशाप्रकारच्या विविध तपासण्या वेदान्त हॉस्पीटलच्या तज्ञ डॉक्टरांतर्फे करण्यात आल्या. पोलिसांच्या रक्त चाचण्या मेट्रो पोलिस हॉस्पीटलच्या सहकार्याने करण्यात आली. या कार्यक्रमाची सुरुवात ठाणे ग्रामीण पोलिस अधिक्षक शिवाजी राठोड


उर्वरित पृष्ठ 4 वर

# दहिसर ते वांद्रे कांदळवन क्षेत्र होणार झोपडीमुक्त

**मुंबई- दहिसर-वांद्रे परिसरातील १ हजार ४३५ हेक्टरवरील कांदळवनात ४२३ होत्या, त्यांपैकी आता अवघ्या ४५ झोपड्या उरल्या असून येत्या काही काळात त्या काढल्या की पश्चिम उपनगरातील कांदळवन झोपडीमुक्त होईल.**

पश्चिम मुंबईचे वनपरिक्षेत्र अधिकारी प्रशांत देशमुख यांनी यासंदर्भात सांगितले की, चारकोप आणि मालवणी परिसरात डेब्रिजची समस्या मोठी होती. भूमाफियांकडून कांदळवन परिसरात डेब्रिज टाकून अनधिकृतरीत्या झोपड्या बांधल्या जातात. चारकोपमध्ये आठ ते दहा दिवसांपूर्वी एक डेब्रिज वाहन ताब्यात घेण्यात आले होते. तीन आरोपींना अटक झाली. एका डेब्रिज वाहनावर कारवाई सुरू आहे. मालवणीमध्ये ऑक्टोबरमध्ये डेब्रिजच्या पाच गाड्या पकडण्यात आल्या होत्या. मागील महिन्यात १६ आरोपींना पकडून एक मोठी कारवाई करण्यात आली. तसेच कांदळवन विभागात पार्किंग लॉट तयार करून व्यवसाय केला जात होता. पार्किंग गाड्या ताब्यात घेऊन त्यांच्यावर दंड आकारण्यात आला आहे. कांदळवन परिसरातील आतापर्यंत दोन पार्किंग लॉटवर कारवाई करण्यात आली आहे. कारवाईतून ५ लाख २८ हजार रुपये दंड वसूल करून शासनाकडे जमा करण्यात आला आहे. बोरीवली, कांदिवली, मालवणी, चिकूवाडी आणि मार्वे येथील अनधिकृत झोपड्यांवर तोड कारवाई करण्यात आली.



उर्वरित काही झोपड्यांवर जानेवारी महिन्यापर्यंत तोड कारवाई केली जाईल. दहिसर येथील गणपत पाटील नगर, गोरेगाव पहाडी परिसर, वर्सोवा येथे सरकारी किंवा खासगी जमिनीवर झोपड्या वसल्या आहेत. खासगी कांदळवन परिसरातील कडेकडेला झोपड्या वसलेल्या दिसून येतात. सर्व झोपड्या या ५० मीटरच्या क्षेत्रात तयार होत आहेत, असेही देशमुख यांनी सांगितले.

१ हजार ४३५ हेक्टर परिसरात अतिक्रमण झाले होते. ते कांदळवन अधिकाऱ्यांनी कारवाई करून हटविले; तसेच कुर्ला १ हजार ०४३.५२ हेक्टर, अंधेरी १०६.५९ हेक्टर आणि बोरीवली ६२४.७२ हेक्टर असा एकूण १ हजार ७७४.८४ हेक्टर खासगी जागा आहे. या जागेवरही कांदळवन निर्माण झाले आहे.

# शीव-पनवेल महामार्गावर आठ पदरी बोगदा

**मुंबई-** नवी मुंबईतील अंतर्गत वाहतुकीमुळे शीव-पनवेल महामार्गावर होणारी कोंडी दूर करण्यासाठी तुर्भे ते खारघरदरम्यान सहा किमी लांबीचा बोगदा तयार करण्याची योजना राज्य सरकारने आखली आहे. या आठ पदरी बोगद्यामुळे महामार्गावरील वाहतूक सुसाट होणार असून वाहनांचे किमान दोन तास वाचण्याची चिन्हे आहेत. या बोगद्याची तांत्रिक आणि वित्तीय सुसाध्यता तपासण्यासाठी सल्लागार कंपनीची नियुक्तीही करण्यात आली आहे.



शीव-पनवेल महामार्ग आणि ठाणे-बेलापूर रस्ता या दोन्ही मार्गावर सातत्याने वाहनांची वर्दळ असते. त्यातही अवजड वाहनांमुळे या रस्त्यावर गर्दीच्या वेळी वाहतूक विस्कळीत होण्याचे प्रकार वारंवार घडतात. पावसाळ्यात रस्त्यावरील खड्ड्यांमुळे या मार्गावर वाहनांचा वेग मंदावतो व वाहनांची मोठी रांग लागते. परिणामी मुंबईहून पुणे, कोकण, गोवा या दिशेने जाणाऱ्या वाहतुकीला मोठा फटका बसतो. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली काही दिवसांपूर्वी झालेल्या पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत या मार्गावरील वाहतूक कोंडीवर झालेल्या चर्चेनंतर पर्यायी व्यवस्थेचा शोध घेण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागास दिले होते. त्यानुसार तुर्भे-खारघर दरम्यान पारसिक डोंगरातून आठ पदरी बोगदा बांधण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. सुमारे सहा किलोमीटर लांबीच्या आठपदरी बोगद्यामुळे वाहनांना सानपाडा, नेरुळ, बेलापूर या भागाला वळसा घालून थेट जाता येईल. त्यामुळे अंतर आणि वेळेची बचत होणार आहे. या बोगद्याची जबाबदारी सरकारने राज्य रस्ते विकास महामंडळावर सोपविली असून त्यासाठी आवश्यक तांत्रिक आणि वित्तीय मदत करण्याची जबाबदारी सिडको आणि औद्योगिक विकास महामंडळावर सोपविण्यात आल्याची माहिती मंत्रालयातील उच्चपदस्थ सूत्रांनी दिली.

# 'मोनो' कात टाकणार!



**मुंबई** - शुभारंभापासूनच रडतखडत सुरू असलेली भारतातील पहिली मोनोरेल वाहतूक यंत्रणा आता कात टाकणार आहे. गेल्या चार वर्षांपासून मोनोरेल चालवण्याची जबाबदारी असलेल्या मलेशियन कंपनी 'स्कोमी'ने कामात कसूर केल्याचा ठपका ठेवत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) मोनोच्या चाव्या शुक्रवारपासून स्वत:कडे घेतल्या. आता मोनोच्या सध्याच्या दोन गाड्यांची दुरुस्ती करण्यासोबतच येत्या महिनाभरात आणखी दहा गाड्यांसाठी निविदा काढण्याचा निर्णय प्राधिकरणाने घेतला आहे. तसेच येत्या तीन महिन्यांत मोनोरेलचा वडाळा ते सातरस्ता हा दुसरा टप्पाही कार्यान्वित केला जाणार आहे.

'स्कोमी' आणि 'एल अॅण्ड टी' यांनी संयुक्तपणे तयार केलेल्या 'एलटीएसई' कंपनीच्या गळ्यात मोनोची माळ टाकून 'एमएमआरडीए'ने फेब्रुवारी २०१४ मध्ये मोनोच्या पहिल्या टप्प्याचे लोकार्पण केले. मात्र, सुरुवातीपासूनच या रेल्वेसेवेला प्रवाशांचा कमी प्रतिसाद मिळाला. त्यातच नोव्हेंबर २०१७ मध्ये म्हैसूर कॉलनी स्थानकात गाडीला लागलेल्या आगीनंतर जवळपास १० महिने मोनोसेवा पूर्णपणे बंद होती. या आगीमुळे २५ कोटींचे नुकसानही झाले. 'एमएमआरडीए'ने 'स्कोमी'ला आर्थिक बळ देऊन १ सप्टेंबरपासून मोनोची सेवा पुन्हा सुरू केली. यादरम्यान 'स्कोमी'चे कंत्राट संपल्यानंतर एमएमआरडीएने काढलेल्या निविदांना प्रतिसाद न मिळाल्याने मोनोरेलची जबाबदारी पुन्हा 'स्कोमी'कडेच देण्यात आली; परंतु वारंवार सूचना देऊनही 'स्कोमी'ने कंत्राटातील वायदे पूर्ण न केल्याने अखेर या कंपनीला बाहेरचा रस्ता दाखवण्यात आला.

नव्या मोनो गाड्यांची पूर्तता, नादुरुस्त गाड्यांच्या यांत्रिक भागांचा पुरवठा, दुसरा टप्पा कार्यान्वित करण्याची निश्चिती अशा कंत्राटामधील अटी गेल्या वर्षभरात स्कोमीने पूर्ण केल्या नाहीत. शिवाय त्याबाबत कोणत्याही प्रकारची हालचाल केली नाही. त्यामुळे अखेरीस त्यांना प्रकल्पामधून हद्दपार करून शुक्रवारपासून संपूर्ण कारभार आम्ही स्वीकारल्याची माहिती 'एमएमआरडीए'चे महानगर आयुक्त आर.ए. राजीव यांनी दिली. तसेच व्यवस्थापनाच्या दृष्टीने विविध विभागांचे प्रमुख म्हणून प्राधिकरणातील कर्मचाऱ्यांची नियुक्ती केल्याचे त्यांनी सांगितले. सध्या 'प्रकल्प अंमलबजावणी युनिट'कडून (पीआययू) व्यवस्थापनाचे काम पाहिले जाणार आहे. त्यानंतर नव्याने स्थापन होणाऱ्या 'मुंबई मेट्रो संचालन महामंडळा'मध्ये मोनो प्रकल्पाचा समावेश करण्यात येणार असल्याचे राजीव म्हणाले.

# घरगल्ल्या तुंबविणाऱ्या ५०० कुटुंबांना पालिकेची नोटीस

**मुंबई- गेले वर्षभर प्रबोधन करूनही दोन इमारतींमधील घरगल्ल्यांमध्ये कचरा टाकणाऱ्या दक्षिण मुंबईमधील तब्बल ५०० कुटुंबीयांवर पालिकेने नोटीस बजावली आहे. नोटीसला समाधानकारक उत्तर न देणाऱ्या कुटुंबांविरुद्ध न्यायालयात खटला दाखल करण्याची तयारी पालिकेने केली आहे. त्यामुळे या कुटुंबांचे धाबे दणाणले आहे.**

दक्षिण मुंबईमधील पालिकेच्या 'सी' विभाग कार्यालयाच्या हद्दीतील रहमान स्ट्रीट, मौलाना शौकत अली रोड, पाचवा कुंभारवाडा, नानुभाई देसाई रोड, सी. पी. टँक, व्ही. पी. रोड, बी. जे. रोड., ए. के. रोड, आनंदीलाल पोदार मार्ग या परिसरात मोठ्या संख्येने दाटीवाटीने इमारती उभ्या आहेत. दोन इमारतींमध्ये जेमतेम अर्धा ते एक फूट रुंद अशा एकूण १७१७ घरगल्ल्या आहेत. या इमारतींमधील रहिवासी या घरगल्ल्यांमध्ये सर्रास कचरा फेकत असून घरगल्ल्या कचऱ्याने तुडुंब भरल्या आहेत. घरात नको असलेला कचरा, उष्टे खरकटे घरगल्ल्यांमध्ये टाकण्यात येत असल्यामुळे या परिसरात उंदीर आणि घुशींचा सुळसुळाट झाला आहे. दाटीवाटीने उभ्या असलेल्या इमारतींदरम्यानच्या घरगल्ल्यांमधूनच गेलेल्या जलवाहिन्यांद्वारे रहिवाशांना पाणीपुरवठा होत आहे. न्हाणीघर, सांडपाण्याच्या फुटलेल्या वाहिन्यांमधून घरगल्ल्यांमध्ये गळती होत असून काही ठिकाणी सांडपाणी आणि कचरा यामुळे घरगल्ल्यांना बकाल रूप आले आहे. घरगल्ल्यांमधून गंजून रहिवाशांना दूषित पाणीपुरवठा होत आहे. त्यामुळे डासांचा प्रादुर्भाव होत असून रहिवाशांच्या आरोग्याचे प्रश्न निर्माण होत आहेत. घरगल्ल्या स्वच्छ राहाव्यात यासाठी 'सी' विभाग कार्यालयाने २ ऑक्टोबर २०१७ पासून या परिसरात जनजागृती मोहीम हाती घेतली होती. घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी घरोघरी जाऊन घरगल्ल्यांमध्ये कचरा टाकू नये, त्यामुळे होणारे दुष्परिणाम याबाबत जनजागृती केली. मात्र एक वर्ष लोटल्यानंतरही परिस्थितीत फारसा बदल आढळून आला नाही. त्यामुळे आता 'सी' विभाग कार्यालयाने धोबीतलाव, भुलेश्वर, घोगारी मोहल्ला, खारा टँक, कुंभारवाडा या भागातील घरगल्ल्यांमध्ये कचरा टाकणाऱ्या तब्बल ५०० कुटुंबांवर नोटीस बजावली आहे. कचरा करणाऱ्यांवर प्रति दिन एक हजार रुपये दंडात्मक कारवाई करण्याची तरतूद पालिकेच्या नियमात आहे. मात्र दंडाची आकारणी करणाऱ्या पालिका कर्मचाऱ्यांशी रहिवासी हुज्जत घालत असून वेळप्रसंगी प्रकरण हातघाईवर आल्यानंतर पोलिसांना पाचारण करण्याची वेळ कर्मचाऱ्यांवर येत आहे. ही बाब लक्षात घेऊन घरगल्ल्यांमध्ये कचरा टाकणाऱ्यांवर नोटीस बजावण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती पालिका अधिकाऱ्याने दिली. काही भागात सकाळी १० ते ११ च्या दरम्यान कचरा गोळा करण्यासाठी घंटागाडी फिरत असते. मात्र रहिवासी घंटागाडीमध्ये कचरा टाकण्याऐवजी घरगल्ल्यांमध्ये टाकत आहेत. तसेच काही दुकानदारही रस्त्यावरच कचरा टाकत असून त्यांच्यावरही नोटीस बजावून न्यायालयात खटला दाखल करण्यात येणार असल्याचे या अधिकाऱ्याने सांगितले.



# दांडी मारणाऱ्या नगरसेवकांना चाप; बायोमेट्रिकचे बंधन

**मुंबई-** पालिका कर्मचाऱ्यांप्रमाणे नगरसेवकांचीही बायोमेट्रिक हजेरी घेतली जाणार आहे. सभागृहाबाहेरील यंत्रावर आपला ठसा उमटवल्यानंतरच सर्वपक्षीय नगरसेवकांना सभागृहाचे द्वार उघडणार आहे. त्यामुळे दांडीबहाद्दर नगरसेवकांची नोंद तत्काळ होणार आहे.

मुंबई महापालिकेत २२७ नगरसेवक निवडून आले आहेत. जनतेचे प्रतिनिधी असल्याने त्यांचे प्रश्न नगरसेवकांना पालिका महासभेत मांडता येतात. अनेक जिव्हाळ्याचे प्रश्न हाताळून प्रशासनाला धारेवर धरण्याची ताकद नगरसेवकांना या सभागृहानेच मिळवून दिली आहे. दर महिन्याला होणाऱ्या या बैठकांना हजेरी लावण्यासाठी नगरसेवकांना भत्ताही मिळतो. मात्र बरेच नगरसेवक महासभेला दांडी मारतात. तर, बहुतांश नगरसेवक



सभागृहात येण्याआधी मस्टरवर सही करून पळ काढतात. सर्वच पक्षांत असे दांडीबहाद्दर नगरसेवक असल्याने त्यांना चाप बसावा, अशी गटनेत्यांची इच्छा होती. त्यामुळे नगरसेवकांच्या बायोमेट्रिक हजेरीच्या प्रस्तावाला सर्वपक्षीय गटनेत्यांच्या बैठकीत मंजुरी मिळाली होती. या प्रस्तावाला गुरुवारी पालिका महासभेतही मंजुरी मिळाली. नगरसेवकाला प्रत्येक महासभेला हजेरी लावण्यासाठी दीडशे रुपये मिळतात. एका महासभेवर १० ते १५ हजार रुपये खर्च करण्यात येतो. तरीही अनेक नगरसेवक महासभेला दांडी मारतात. तर, बहुतांश नगरसेवक सभागृहात येण्याआधी मस्टरवर सही करून पळ काढत असल्याचे समोर आले आहे. त्यामुळेच आता त्यांना चाप बसवण्यासाठी सभागृहात प्रवेश करण्यापूर्वी व बाहेर जाताना बायोमेट्रिक हजेरी नगरसेवकांना बंधनकारक करण्यात आली आहे.

# मिनी ट्रेनच्या वातानुकूलित डब्यामुळे ३० हजारांची कमाई

**मुंबई-** माथेरानच्या मिनी ट्रेनला एक वातानुकूलित डबा जोडण्यात आला असून त्याला प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. गेल्या तीन दिवसांत या ट्रेनद्वारे मध्य रेल्वेने ३० हजार रुपयांची कमाई केली आहे. नेरळ-माथेरान-नेरळ मार्गावर धावणाऱ्या मिनी ट्रेनला ८ डिसेंबरपासून एक वातानुकूलित डबा जोडण्यात आला आहे. १६ प्रवासी क्षमता असलेल्या या डब्यातून प्रवासासाठी प्रत्येकी ४१५ रुपये शुल्क आकारले जाते. हा डबा सेवेत येताच त्याला प्रवाशांनी चांगला प्रतिसाद दिला. या ट्रेनच्या दोन्ही फेऱ्या रविवारी हाऊसफुल होत्या. वातानुकूलित डब्यात शनिवारीही नेरळ येथून जाताना १६ आणि येताना सहा प्रवासी होते. सोमवारीही माथेरानमध्ये जाताना वातानुकूलित डब्यातील सर्व आसने भरलेली होती. येताना मात्र एकच प्रवासी होता. गेल्या तीन दिवसांत यातून ३० हजार रुपये उत्पन्न मध्य रेल्वेला मिळाले आहे. परंतु शुल्क कमी करण्याची मागणी प्रवाशांकडून होत आहे.



# पदोन्नतीसाठी मराठा क्रांती ठोक मोर्चाचा आंदोलनाचा इशारा

**मुंबई-** पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षेत गुणवत्ता यादीत उत्तीर्ण होऊनही, ५८६ पोलीस तरुणांना पदोन्नतीपासून डावलले. पुढील दोन दिवसांत ५८६ त्यांना पदोन्नतीचा आदेश मिळाला नाही, तर मराठा क्रांती मोर्चातर्फे १८ डिसेंबरला आंदोलन केले जाईल, अशी भूमिका मराठा क्रांती ठोक मोर्चाचे समन्वयक आबासाहेब पाटील यांनी मांडली.

पाटील म्हणाले, ५८६ तरुणांना पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय पदोन्नती परीक्षेत २३० पेक्षा जास्त गुण मिळालेले आहेत. पदोन्नती परीक्षा पास होऊन एक वर्षे उलटून गेले, तरीही त्यांना पदोन्नती देण्यात आली नाही.



हे पोलीस तरुण १२ ते १४ तास आपली कर्तव्ये पार पाडत असतात. त्यांच्यावर सातत्याने अन्याय होत आहे. या संदर्भात निर्णय घेण्यात आला नाही, तर मराठा क्रांती ठोक मोर्चा आंदोलन करेल. पोलीस तरुणांवर सातत्याने अन्याय होत आहे. तसेच, महसूल विभागातील अप्पर जिल्हाधिकारी पदोन्नतीबाबत अशीच स्थिती आहे. राज्यातील अप्पर जिल्हाधिकारी संवर्गात सद्यस्थितीत ३४ पदे रिक्त आहेत. राज्यामध्ये ७२ उपजिल्हाधिकारी कार्यरत असताना, त्यांना रिक्त पदावर पदोन्नती दिली जात नाही. याबाबत मुख्यमंत्री, महसूलमंत्र्यांना अनेकदा निवेदन देऊनही सकारात्मक भूमिका घेतली नसल्याचे पाटील म्हणाले.

# 'जीत' प्रकल्पातून क्षयरोगमुक्त महाराष्ट्राचे उद्दिष्ट; राज्यातील १३ शहरांचा समावेश

**मुंबई-** 'जीत' प्रकल्पाच्या माध्यमातून क्षयरोगमुक्त महाराष्ट्राचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी जास्तीत जास्त क्षयरुग्णांना वेळेवर व संपूर्ण उपचार घेण्यास प्रवृत्त करण्यात येत आहे. या उपक्रमात खासगी रुग्णालये तसेच शासकीय आरोग्य संस्थाची भूमिका महत्वाची आहे. राज्यातील १३ शहरांमध्ये हा प्रकल्प राबविण्यात येणार असल्याचे, आरोग्यमंत्री डॉ. दीपक सावंत यांनी आज येथे सांगितले. टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स येथे आयोजित करण्यात आलेल्या ठराष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमठ अंतर्गत 'जीत' प्रकल्पाच्या उद्घाटन सोहळ्या प्रसंगी ते बोलत होते. यावेळी आरोग्यमंत्र्यांच्या हस्ते ठरिवाईज्ड नॅशनल ट्युबर्क्युलोसिस कंट्रोल प्रोग्रॅमठ या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

आरोग्यमंत्री यावेळी म्हणाले,



मुंबईत दररोज लाखो लोक रेल्वे, बस या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेतून प्रवास करतात. त्यामुळे संसर्गजन्य रोग पसरण्याची शक्यता जास्त असते. क्षयरोग झालेले किती रुग्ण संपूर्ण उपचार घेतात? हा मोठा प्रश्न समोर उभा राहतो. क्षयरोगावर संपूर्ण व नियमित उपचार घेतला तर तो बरा होऊ शकतो. आरोग्य विभाग यासाठी अनेक उपक्रम राबवत आहे. यासंदर्भात करण्यात आलेल्या सर्वेक्षणातून असे आढळून आले की, बहुतांश क्षयरुग्ण संपूर्ण उपचार घेत नाहीत. त्यामुळे संसर्ग वाढतो व परिणामी रुग्ण दगावण्याची शक्यता असते. क्षयरोग झालेल्या रुग्णांची संपूर्ण माहिती तसेच त्यांनी घेतलेले उपचार यावर संनियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. 'जीत' प्रकल्पाच्या माध्यमातून जास्तीत जास्त रुग्णांना उपचार घेण्यासाठी प्रवृत्त करता येईल. क्षयरुग्णांविषयी संपूर्ण माहिती उपलब्ध झाल्यामुळे त्यांना योग्य उपचाराखाली आणणे सोयीस्कर होईल. अशा प्रकारे क्षयरोगमुक्त महाराष्ट्राचे उद्दिष्ट्य साध्य होईल, असा विश्वास आरोग्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला.

केंद्र शासनाच्या मध्यवर्ती क्षयरोग विभागाने केलेल्या सर्वेक्षणातून असे आढळून आले की, ६० टक्के क्षयरुग्ण खासगी क्षेत्रात उपचार घेतात. खासगी वैद्यकीय व्यावसायिकांकडे उपचार घेणाऱ्या अशा क्षयरुग्णांची माहिती जमा करुन त्यांना उपचाराच्या कक्षेत आणण्यासाठी 'जीत' प्रकल्प सुरु करण्यात आला आहे.

# 'काँग्रेस हाच भाजपला पर्याय' – शरद पवार

**मुंबई** - पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांमध्ये भाजपबद्दलची नाराजी मतदारांनी स्पष्टपणे व्यक्त केली आहे. भाजपला पर्याय म्हणून काँग्रेस उभा ठाकला आहे. त्यामुळे सार्वत्रिक निवडणुकांनंतर राजकीय चित्र बदलेल, असे भाकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी बुधवारी येथे केले. काँग्रेसने नवीन पिढीकडे नेतृत्व सोपवले. ते लोकांनी मान्य केले आहे. सार्वत्रिक निवडणुकीत तिसरी आघाडी किंवा यूपीए ३ असे काही नसेल. मात्र देशपातळीवरील प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी आपापसातील मतभेद विसरून सर्वांनी एकत्र आले पाहिजे, अशी अपेक्षाही



पवार यांनी व्यक्त केली. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या सभागृहात पवार यांनी कार्यकर्ते, नेते, विविध क्षेत्रांतील मान्यवर यांच्या उपस्थितीत साधेपणाने आपला ७८ वा वाढदिवस साजरा केला. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष अशोक चव्हाण, माणिकराव ठाकरे यांच्यासह अनेक नेत्यांनी पवार यांची भेट घेऊन अभिष्टचिंतन केले.

पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांच्या निकालांविषयी पवार म्हणाले की, मतदारांनी स्पष्ट नाराजी व्यक्त केल्याचे दिसते. मतदारांचा कौल पाहता भाजप सोडून इतर पक्षांमध्ये समाधान आहे. भाजपला काँग्रेस हा महत्त्वाचा पर्याय आहे. ज्या-ज्या वेळी निवडणुका होतील त्या वेळी मतदार चित्र बदलतील. सर्वोच्च न्यायालयाच्या चार न्यायाधीशांनी पत्रकार परिषद घेतली, रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरांनी राजीनामा दिला, सीबीआयमधील वाद चव्हाट्यावर आला. दिलेली आश्वासने पंतप्रधान या निवडणुकीत विसरले आणि फक्त एका कुटुंबाबद्दल बोलत राहिले. ज्यांनी पंडित नेहरू, इंदिरा गांधी यांना पाहिले नाही, तरीही ते एका कुटुंबावर हल्ला करत राहिले. त्याचा परिणाम निवडणूक निकालातून दिसला, असे पवार म्हणाले.

# ...तरीही झिकाचा पॉझिटिव्ह रुग्ण आढळलाच नाही!

**मुंबई-** राज्याच्या बाहेरून आलेल्या 'झिका' व्हायरसने राज्यात वर्षभर दहशत पसरविली. यानंतर पालिका प्रशासनासह सार्वजनिक आरोग्य विभागही झिकाच्या प्रतिबंधासाठी सज्ज झाला. परिणामी, गेल्या १० महिन्यांत झिका व्हायरसचे १ हजार ४६३ नमुने पुण्यातील राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्थेत तपासणीसाठी पाठविले. यात राज्यातील ४९८ नमुन्यांचा समावेश होता, मात्र इतके नमुने तपासूनही झिकाचा एकही पॉझिटिव्ह रुग्ण आढळून आला नसल्याची माहिती राज्य साथरोग नियंत्रण शाखेने दिली आहे. बाहेरून राज्यात पसरलेल्या झिका व्हायरसने सामान्यांच्या मनात भीती निर्माण केली होती. १ जानेवारी ते ३० नोव्हेंबर २०१८ या काळात पुण्यातील राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्थेत १ हजार ४६३ नमुने तपासले आहेत. तर यात राज्यातून



एकूण ४९८ झिका व्हायरसचे नमुने तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्यात सर्वाधिक नमुने वर्धा जिल्ह्यातून पाठविण्यात आले होते. मुंबईतून केवळ चार नमुने पाठवले होते. माहिती अधिकारांतर्गत या संस्थेत झिका व्हायरसचे वर्धा येथून ४६२ नमुने, पुण्यातून ३२ नमुने आणि मुंबईतून चार नमुने पाठवले आहेत. डेंग्यू, चिकूनगुनिया याच प्रकारचा 'झिका' हा एक विषाणू आहे. एडिस एजिप्ती या डासामुळे झिका विषाणू पसरतो.

# संपादकीय...

## लोकशाहीच्या मोदीकरणाला मतदारांचा शह



संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक

पाच राज्यांमधील निवडणुकीने भाजपाला धडा दिलाच, शिवाय पंतप्रधान नरेंद्र मोदी हे हुकूमशहा बनू शकतात, अशी जी चर्चा दबक्या आवाजात देशभर चालू होती, तिला मूठमाती देण्याचे काम केले आहे. किंबहुना असे मानता येईल की भाजपाच्या तिरस्कारयुक्त व उद्धट वर्तणुकीला आणि दुस-यांना तुच्छ लेखण्याच्या मोदी प्रवृत्तीला मतदारांनी शह दिला आहे. परवाच मी एका ज्येष्ठ भाजपा नेत्याशी बोलत होतो. माझा प्रश्न होता, देशभर दूरचित्रवाणी वाहिन्या भाजपा आणि मोदींच्या उद्धटपणाला जनतेची ही चपराक असल्याचे मत व्यक्त करीत आहेत, त्यात खरेपणा नाही? त्यांचेही मत होकारार्थीच होते. मोदींची विरोधकांना संपविण्याची भाषा, त्यांची एककल्ली कारकीर्द आणि एकूणच लोकशाही संस्थांचे खच्चीकरण करणारी सरकारची कृती ही उद्धटपणाचेच दर्शन घडवत होती. वास्तविक परवा ज्येष्ठ पत्रकार शेखर गुप्ता यांनी या निवडणुकीने भाजपाला १० धडे दिले आहेत, असे सांगणारा लेख लिहिला आहे. या सर्व १० मुद्द्यांचा अर्थ एकच आहे, उद्धटपणा - त्याला लगाम घालावा लागेल, असे त्यांनी सुचविले आहे. हा उद्धटपणा लोकशाहीची निर्भर्त्सना करण्यातून आला. मोदी सरकारच्या प्रत्येक निर्णयातून तो दिसत होता. उदाहरण : त्यांनी ज्या पद्धतीने प्रशासनाची पोलादी चौकट मोडली. अधिका-यांना एकावर एक उलटविले, त्यांच्या हव्या तशा बदल्या केल्या. त्यांचा सर्वोच्च न्यायालय, सीबीआय व रिझर्व्ह बँकेतील हस्तक्षेप गंभीर होता. सीबीआय प्रकरणात तर सर्वोच्च न्यायालयाला हस्तक्षेप करावा लागला. रॉबर्ट वादरा यांच्या मालमत्तेच्या चौकशीमध्ये हस्तक्षेप करणा-या आयएएस अशोक खेमका यांना अनेक बदल्यांना तोंड द्यावे लागले. रिझर्व्ह बँकेतील हस्तक्षेप हा तर लांच्छनास्पदच आहे. लोकशाही प्रबळ बनविणा-या अनेक संस्थांची मोडतोड करण्यात आली. इतिहास बदलण्याचाही सतत प्रयत्न होत राहिला. प्रसार माध्यमे, विशेषत: वृत्तपत्रे आणि दूरचित्रवाणी वाहिन्यांवर ज्या पद्धतीने मोदी सरकारने सेन्सॉरशीप लादली ती तर स्वतंत्र भारतातील हीन आणि धक्कादायक गोष्ट आहे. आम्ही चीनमध्ये सेन्सॉरशीप आहे म्हणतो. पाकिस्तानमध्येही उच्चारस्वातंत्र्याची गळचेपी होत असल्याचे सांगितले जाते. दुर्दैवाने प्रमुख उद्योगपतींनी सरकारच्या सांगण्यावरून प्रसार माध्यमे ताब्यात घेतली आणि ज्या पद्धतीने संपादक बदलले गेले त्याने सा-या पत्रकारविश्वाला हादरा बसला. दुस-या बाजूला समाज माध्यमांमध्ये ट्रोल सेनेने हैदोस घातला.

कोण अशा प्रकारचे वातावरण निर्माण करू शकतो? ज्यांना स्वत:बद्दल आणि आपल्या हेतूबद्दल अवाजवी आत्मविश्वास असतो. मोदी निर्णायक आहेत असे सांगण्यात येते. परंतु त्यांनी पाकिस्तानवर-सर्जिकल स्टाइक, कुरघोडी करताना ज्या पद्धतीने ऊर बडवून घेतला तो आत्मप्रौढीचा भाग होता व लष्कराच्या अशा कारवायांचे खुलेआम राजकीयीकरण केले गेले. मात्र, निर्णायक पंतप्रधान असण्यापेक्षा सरकार ठाम आणि खंबीर असावे अशी अपेक्षा असते. पाकिस्तानवरची कुरघोडी पंतप्रधानांनी केली असा दावा ते करीत असतील तर मग तेव्हाचे संरक्षणमंत्री मनोहर पर्रीकर यांनी काहीच केले नव्हते काय? स्वत: तेव्हा पर्रीकरांनी मला सांगितले होते की संरक्षणमंत्री म्हणून त्यांना पाकिस्तानचा प्रतिकार करायचा प्रत्यक्ष अधिकार आहे. ही कुरघोडी करण्याच्या महिनाभर आधी ते शशिकला काकोडकरांच्या घरी आम्हाला भेटले होते. नंतर ते म्हणाले, हे छापण्यासाठी नाही, आणि असा प्रकार घडेल, तेव्हा आम्हालाच आधी सांगितले जाईल. वास्तविक याला निर्णायकता म्हणायची का? अशा गोष्टी जाहीर करून कृती करायच्या नसतात हे मान्य केले तरी मंत्रिगटाच्या सल्लामसलतीनंतरच अशा कृती केल्या जातात. तरीही पाकिस्तानला या स्ट्राइकनंतर धडकी भरली का, हा प्रश्न अनुत्तरितच राहातो; कारण त्या देशाच्या कुरापती चालूच राहिल्या व प्रॉक्सी वॉर तर सुरूच आहे. परंतु पंतप्रधानांचा सारा अट्टहास स्वत:ला इतरांपेक्षाही श्रेष्ठ- ह्यराष्ट्रवादीहण म्हणून सिद्ध करण्याचा होता, हे लपून राहात नाही. हुकूमशहा हा देशासमोरील मूळ प्रश्नांना सामोरे जाण्याऐवजी इतिहासाचे उदात्तीकरण तरी करतो किंवा भूतकाळात रमतो, पुतळे- आणि तत्सम सांस्कृतिक गोष्टींचे गु-हाळ मांडतो. देशातील शेतकरी सध्या विलक्षण पेचात आहे आणि दैनंदिन जगणे त्याला दुरापास्त होऊन बसलेय, त्यामुळे गुजरात व महाराष्ट्रातील शेतक-यांना आत्महत्या करण्यावाचून पर्याय राहिलेला नाही. देशात अनेक ठिकाणी हिंदू-मुस्लिम तणाव आहे, गायींच्या प्रश्नावरून मानवतेला काळीमा फासणा-या कत्तली केल्या जाताहेत आणि सामाजिक अशांतता वाढीस लागली आहे. देशाच्या स्वातंत्र्याच्या इतक्या वर्षानंतरही अनेक भागांना पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सतावतो आहे आणि रोजगाराचाही प्रश्न भीषण बनला आहे. त्यावर उतारा शोधण्याचे सोडून सरदार पटेलांचा पुतळा उभारला जातो आणि तसेच पुतळे उत्तर प्रदेश, महाराष्ट्रात उभे केले जाताहेत. राम मंदिराचाही प्रश्न पुन्हा उपस्थित होत आहे. मोदींना हे दोष मान्य करावे लागणार आहेत. २०१९मध्ये जर त्यांना टिकायचे असेल तर लोकशाहीवर त्यांना गांभीर्याने विश्वास ठेवावा लागेल. त्यांनी साडेचार वर्षापूर्वी ज्या विकासाचा मुद्दा बनविला होता, त्याबाबत चिंतन करावे लागेल. आपल्या मतदारांना गृहीत धरून तर चालणारच नाही.

# आता उघडी डोळे..



गुणवत्ता यादीत अव्वल क्रमांक आपल्याला मिळणारच म्हणून मिजाशीत राहणाऱ्या विद्यार्थ्यांस प्रत्यक्षात काठावरही उत्तीर्ण होण्याइतके गुण मिळू नयेत, असे सत्ताधारी भाजपचे पाच राज्यांच्या निवडणूक निकालांनी झाले असणार. हे निकाल काँग्रेस आणि त्यातही राहुल गांधी यांच्या नेतृत्वावर जितके शिक्कामोर्तब करणारे आहेत त्यापेक्षाही ते अधिक भाजपच्या घमेंडखोर धुरिणांचा पाणउतारा करणारे आहेत. यासाठी भाजपाध्यक्ष अमित शहा आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी हे दोघे- आणि फक्त दोघेच- इतरांना अजिबात दोष देऊ शकणार नाहीत. ही परिस्थिती या दोघांनीच स्वहस्ते, स्वकर्मे स्वपक्षावर आणली. पाचपैकी तीन राज्ये भाजपने गमावली वा काँग्रेसने कमावली इतकाच मर्यादित या निवडणुकांचा अर्थ नाही. अनेकार्थांनी ही निवडणूक अनेकांना राजकारणाचा अर्थ नव्याने समजावून देते. कसे ते समजून घ्यायला हवे. पहिला धडा म्हणजे निवडणुकीत अत्याधुनिक तंत्रज्ञान, समाजमाध्यमांतील टोळ्या, धोरण, हजारो व्यावसायिकांची फौज, विविध सर्वेक्षणे, मतदारयाद्यांच्या एकेका पानावरील मतदारांची नावे स्मरणात ठेवून त्यांना मतदान केंद्रांपर्यंत आणणारे पन्नाप्रमुख कार्यकर्ते आदी लवाजम्याची गरज असतेच असे नाही. किंबहुना हे सर्व नाही म्हणून राजकारण अडत नाही. हा सर्व देखावा. एखाद्या धनिकाने आपले घर मिळेल त्या दागिन्यांनी मढवले म्हणजे जसा तो समृद्ध मानला जातो असे नाही, तसेच इतका सारा फौजफाटा आहे म्हणून एखादा पक्ष निवडणुका जिंकतो असे नाही. तेव्हा या सगळ्यापेक्षा निवडणूक जिंकण्यासाठी लागतो तो कार्यक्रम. ज्याचा वायदा नरेंद्र मोदी यांनी २०१४ साली केला आणि पुढच्या चार वर्षांत ते विसरून गेले तो कार्यक्रम. याचा अर्थ या निवडणुकीत काँग्रेस पक्षाने सत्ताधारी भाजपपेक्षा अधिक आकर्षक कार्यक्रम दिला असा अजिबात नाही. तसा कार्यक्रम काँग्रेसकडेही नव्हता. पण तरीही मतदारांनी काँग्रेसला कौल दिला. तो का?

याचे कारण सत्ताधारी भाजप विरोधात असलेली नाराजी. जगातील प्रत्येक समस्येचे उत्तर जणू आपल्याकडे आहे आणि त्याद्वारे आपण त्या समस्या सोडवल्याच आहेत, सबब नागरिकांनी हे गुमान मान्य करावे, असे भाजप नेत्यांचे वागणे हे मतदारांच्या संतापाचे महत्त्वाचे कारण. या संपूर्ण निवडणुकीत भाजपचे तारांकित प्रचारक असलेल्या पंतप्रधान मोदी यांच्या प्रचारसभांचा रोख कशावर होता? तर काँग्रेस किती नालायक आहे, हे सिद्ध करण्यावर. मोदी यांनी जवळपास ३६ सभा या निवडणुकांत घेतल्या. पण धर्म, सधवा / विधवा, हनुमानाची जात वगैरे बाष्कळ मुद्द्यांपलीकडे भाजप नेते गेलेच नाहीत. वास्तविक काँग्रेस किती अयोग्य आहे, हे नव्याने मतदारांना सांगण्याची गरजच नव्हती. त्यासाठीच तर मतदारांनी त्या पक्षास विजनवासात पाठवले. अशा वेळी आपण काय करू इच्छितो हे भाजपने सांगायला हवे होते. मध्य प्रदेशातील प्रचार सभांत तर मोदी यांनी शिवराजसिंह चौहान यांना मते द्या असे स्पष्ट आवाहनही केले नाही. हे मतदारांना गृहीत धरणे होते. मतदारांनी त्याची रास्त शिक्षा भाजपला दिली.

दुसरा धडा विकासाच्या सिंहासनावर प्रभू रामचंद्रास बसवण्याचा. निवडणुकांच्या तोंडावर राम मंदिराची मागणी येते आणि राजस्थान, मध्य प्रदेशातील मतदानाच्या काळात अयोध्येतील आरत्यांवर लक्ष केंद्रित केले जाते, यातून काय दिसले? वास्तविक मध्य प्रदेशातील शिवराजसिंह चौहान, राजस्थानातील वसुंधराराजे वा छत्तीसगड राज्यातील डॉ. रमणसिंग यांची कारकीर्द दुर्लक्ष करावी अशी नाही. या तिघांच्याही कामाची दखल घ्यावीच लागेल. मध्य प्रदेशात तर भाजपस इतक्या जागा मिळाल्या त्या केवळ चौहान यांच्यामुळे. अशा वेळी प्रभू रामचंद्रास मदानात उतरवण्याची काहीही गरज भाजपला नव्हती. पण स्वत:स आहे त्यापेक्षा मोठे मानायची सवय लागली की सगळेच भान सुटते. भाजपचे असे झाले. मध्य प्रदेशात मोदी यांच्यापेक्षा उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री अजयसिंग बिश्त ऊर्फ योगी आदित्यनाथ यांनी जास्त प्रचारसभा घेतल्या. मोदी जो दावा करतात ते विकासाचे राजकारण करणाऱ्या मुख्यमंत्र्यांच्या अंगणात विकास म्हणजे उंचच उंच पुतळे आणि देवळांचे सुशोभीकरण किंवा सरकारी इमारतींना भगवा रंग इतकेच माहीत असलेल्या नेत्यास आणून बसवण्याची गरजच काय? मध्य प्रदेशात योगी यांनी १७ सभा घेतल्या तर मोदी यांच्या सभा झाल्या फक्त दहा. राजस्थानात योगी यांच्या सभांची संख्या २६ तर मोदी यांची १२. छत्तीसगड राज्यात तर मोदी यांनी घेतलेल्या सभा आहेत फक्त चार तर योगी यांच्या सभा झाल्या तब्बल २३. या एकाच आकडेवारीवरून छत्तीसगडमधे भाजप साफ का झोपला, राजस्थानात पराभूत का झाला आणि मध्य प्रदेशात त्यातल्या त्यात बरी कामगिरी त्या पक्षाची का झाली, हे ध्यानात यावे. योगी यांच्या सभा जितक्या जास्त तितका पराभव मोठा, असा त्याचा अथ. 'विकासकामांच्या लांबीस पुतळ्यांची उंची हा पर्याय असू शकत नाही, हेच यातून दिसून येते.

तिसरा धडा आहे शहरी आणि ग्रामीण अशा बुजत चाललेल्या दरीचा. मध्य प्रदेशात इंदूरसारख्या अत्यंत शहरी मतदारसंघात भाजप मागे पडलेला आहे तर राजस्थान, छत्तीसगड या राज्यांत शहरी आणि ग्रामीण दोनही मतदारांनी त्यास झिडकारले आहे. विकासाच्या मुद्द्यावर भाळलेला शहरी मतदार भाजपच्या मागे उभा आहे असे चित्र गुजरात निवडणुकांपर्यंत दिसले. काही प्रमाणात कर्नाटक राज्यातही त्याचाच प्रत्यय आला. पण या पाच राज्यांनी हे चित्र पार पुसून टाकले असून शहरी मतदारदेखील भाजपपासून तितक्याच मोठ्या प्रमाणावर दूर जात असल्याचे दिसून आले आहे. ही बाब लक्षणीय. तिची परिणामकारकता किती ते समजून घ्यायला हवे. राजस्थानात काँग्रेसकडे २० आमदारही नव्हते. या वेळी या पक्षाने शंभरी ओलांडली आहे. ही वाढ पाचशे टक्के इतकी प्रचंड ठरते. अधिक खोलात जाणवणारी बाब म्हणजे या एकाच राज्यात सुमारे नऊ ते दहा टक्के मतदारांनी भाजपचा हात सोडून तो काँग्रेसच्या हातात दिला आहे. मध्य प्रदेश, छत्तीसगड मध्येही तीच परिस्थिती. गेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस आणि भाजपच्या मतांत सरासरी १० टक्क्यांचा फरक होता. तो या निवडणुका भरून काढतात. उत्तर प्रदेशात ५१ टक्क्यांनी विजयी होणारा भाजप पोटनिवडणुकीत १३ टक्के मते घालवून बसला. ही घटना एखाददुसरी म्हणून त्या वेळी त्याकडे दुर्लक्ष केले गेले. पण वास्तव तसे नाही. लक्षणीय संख्येने भाजप मतदारांचे पक्षांतर होताना याही वेळी दिसून आले. ही त्या पक्षासाठी चिंतेची बाब ठरते. राजस्थानात अनेक विद्यमान मंत्र्यांचा पराभव झाला. यातून हेच समोर येते.


चौथा मुद्दा शेतकऱ्यांना लावल्या जाणाऱ्या चुन्याचा. केवळ हमीभाव दुप्पट करणे म्हणजे शेतकऱ्यांचे कल्याण नव्हे, हे याआधीही अनेकांनी दाखवून दिले आहे. भाजपने त्याकडे दुर्लक्ष केले. या निवडणुकांत समस्त शेतकरी वर्ग भाजप विरोधात जाताना दिसला. मोअर क्रॉप पर ड्रॉप, उत्पन्न दुप्पट करणार वगैरे चकचकीत घोषणांना शेतकऱ्यांनी भुलण्याचे दिवस राजकारणातून कधीच गेले. या वर्गास उद्यापेक्षा आज अधिक गांभीर्याने भेडसावतो. पण भाजपचा सगळा भर भविष्यात चांगले काही करण्याचा. परंतु हा भविष्यकाळ वर्तमानात कधी उगवणार हे त्यांनाही ठाऊक नाही. त्यामुळे भविष्यकाळाच्या नुसत्याच गप्पा. त्या रसाळ गप्पांत शेतकऱ्यांना रस नाही. त्यांना त्यांच्या शेतमालासाठी बाजारपेठ, योग्य दर हवा आहे. कर्जमाफीच्या दानाने आता त्यांची झोळी भरत नाही. भाजपला हे अद्याप न उमगलेले सत्य या निवडणुकांनी कळू शकेल. शेतकऱ्यांना हवे ते दिले की ते किती पाठिंबा देतात हे तेलंगणातील निकाल दाखवतातच.

पाचवा आणि अत्यंत महत्त्वाचा धडा आहे वागणुकीचा. भारतीय मतदार प्रामाणिक मुजोरी आणि अप्रामाणिक नम्रता या दोहोंसही तितक्याच तीव्रतेने झिडकारतो. भाजपच्या मध्यवर्ती नेत्यांत हे दोन्ही सखोल मुरलेले आहेत. नम्रता म्हणजे केवळ स्वत:स प्रधानसेवक म्हणणे नव्हे. विरोधकांशी, मग तो य:कश्चितही का असेना, आदराने वागणे म्हणजे नम्र सभ्यता. भाजप नेत्यांना ती आता अंगी बाणवावी लागेल. याला राज्यातून हाकलून लावू, त्याचे नामांतर करू वगैरे कालबाह्य बडबड या मंडळींना बंद करावी लागेल. ताज्या निकालाचा तो संदेश आहे.

# १२ वर्षात ४७ हजार बेकायदा बांधकामे

## कल्याण-डोंबिवलीतील २००७ ते २०१८ दरम्यानच्या नवीन बांधकामांचा तपशील उघड

**कल्याण - बेकायदा बांधकामांसाठी नेहमीच कुप्रसिद्ध राहिलेल्या कल्याण डोंबिवली महापालिका हद्दीतील बेकायदा बांधकामांची व्याप्ती किती मोठी आहे, याचा लेखाजोखाच समोर आला आहे. जानेवारी २००७ ते सप्टेंबर २०१८ या १२ वर्षाच्या काळात दोन्ही शहरांत तब्बल ४७ हजार २७३ नवीन बेकायदा बांधकामे उभी राहिली आहेत. सर्वाधिक बेकायदा बांधकामे मागील तीन वर्षात उभी राहिली आहेत. विशेष म्हणजे, पालिकेच्या रीतसर परवानगीसह उभ्या राहिलेल्या बांधकामांची संख्या पाच हजार ७९० इतकीच आहे.**



मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशावरून निवृत्त न्या. ए. एस. अग्यार यांनी कल्याण-डोंबिवली पालिका हद्दीत १९८७ ते २००७ या कालावधीत उभ्या राहिलेल्या ६७ हजार ९५४ बेकायदा बांधकामांची चौकशी केली. चौकशी अहवाल राज्य सरकार, उच्च न्यायालयाला दिला. शासनाने यामधील दोषी २०० हून अधिक अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश स्थानिक प्रशासन, शासनाला दिले आहेत. न्या. अग्यार यांच्या चौकशी नंतर (जानेवारी २००७) कल्याण-डोंबिवली पालिका हद्दीत नव्याने किती बेकायदा बांधकामे उभी राहिली तसेच अशा बेकायदा (अनधिकृत बांधकामांवरील कारवाईला बाधा न येता) आणि अधिकृत मालमत्तांना कर आकारणी करण्यात आली आहे का, अशी विचारणा माहिती अधिकार कार्यकर्ते श्रीनिवास घाणेकर यांनी माहिती अर्जाद्वारे पालिकेकडे केली होती.

मालमत्ता विभागाने दिलेल्या माहितीत अतिरिक्त आयुक्त संजय घरत हे अतिक्रमण नियंत्रण विभागाचे नियंत्रक असताना तीन वर्षांच्या कालावधीत सात हजार ते नऊ हजारापर्यंत बेकायदा उभी राहिल्याचे दिसून येत आहे. वादग्रस्त निलंबित कर उपायुक्त अनिल लाड यांच्या मागील दीड वर्षांच्या काळात बेकायदा बांधकामांना मालमत्ता कर लावण्याचे प्रमाण अधिक असल्याचे माहितीतून स्पष्ट झाले आहे. घरत, लाड हे दोन्ही वादग्रस्त अधिकारी सध्या निलंबित आहेत. बेकायदा बांधकामांच्या बांधकामातून मोठी उलाढाल आणि अधिकाऱ्यांचे हात ओले करण्याचे प्रमाण अधिक असल्याने या बांधकामांकडे दुर्लक्ष झाले, असा आरोप घाणेकर यांनी केला आहे.

# काळ्या काचांच्या वाहनांवर कारवाई

## ठाणे वाहतूक पोलिसांकडून २८ लाख ७२ हजारांचा दंडवसुली

**ठाणे** - वाहनांच्या काचांना काळ्या रंगाच्या फिल्म्स लावून काचा झाकून ठेवण्याचा प्रयत्न केला जात असून त्या विरोधात ठाणे वाहतूक पोलिसांनी धडक कारवाई केली आहे. गेल्या ११ महिन्यांमध्ये पोलिसांनी १४ हजार १६० वाहनांवर कारवाई करत त्यांच्याकडून २८ लाख ७२ हजार ५०० रुपयांचा दंड वसूल केला आहे. याबरोबरच फॅन्सी नंबर प्लेट्सही पोलिसांच्या रडारावर असून २५४ वाहनांवर कारवाई करण्यात आल्या असून २ लाख ४७ हजार ८०० रुपयांचा दंड वसुल करण्यात आल्याचे वाहतूक पोलिसांनी स्पष्ट केले आहे. नियमांचा भंग करत



वाहनांना काळ्या फिल्म्स लावणारे आणि फॅन्सी नंबर प्लेटधारकांची संख्या मोठी असल्यामुळे ही कारवाई अधिक तीव्र करण्याच्या दृष्टीने प्रशासनाकडून प्रयत्न सुरू झाले आहेत.

वाहनांच्या काचा पारदर्शक असाव्यात, असा नियम असून मागील आणि बाजूच्या काचांना काही अंशी दिलासा दिला जातो. परंतु अत्यंत दाट काळ्या रंगाच्या काचा बसवून किंवा काचांवर फिल्म चिकटवून गाड्या अपारदर्शक करण्याचा प्रयत्न वाहनचालकांकडून केला जातो. अशा वाहनचालकांविरोधात वाहतूक पोलिस प्रशासनाकडून सातत्याने कारवाई केली जात आहे. दंडात्मक कारवाया होत असतानाही अशा गैरप्रकार कायम असल्याचे समोर आले आहे. ठाणे परिसरातील वेगवेगळ्या भागांमध्ये आजही महागड्या गाड्यांवर फॅन्सी नंबर प्लेट्स लावण्याचा ट्रेंड कायम असून अशा ३५४ नंबर प्लेटवर पोलिसांनी कारवाई केली आहे. त्यांच्याकडून २ लाख ४७ हजार ८०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

# ठाणे जिल्ह्यात आठवड्याला १० अपघाती बळी

**ठाणे** - 'वाढते रस्ते अपघात आणि त्यात बळी पडणाऱ्यांची संख्या' हा देशभरात चिंतेचा विषय बनला असून सर्वोच्च न्यायालयाने रस्ते अपघात आटोक्यात आणण्याबाबत निर्देश दिले आहेत. त्यासाठी विविध उपाययोजना केल्याचेही सरकारी यंत्रणा सातत्याने सांगत असतात. मात्र, त्यानंतरही अपघातात घट होत नसून ठाणे जिल्ह्यात जानेवारी ते नोव्हेंबर या कालावधीत ४९५ जणांचा मृत्यू अपघात झाला आहे. गेल्यावर्षी या ११ महिन्यांतील मृतांचा आकडा ४१८ होता. जखमींचा आकडाही १४३३ वरून यंदा १५१२ इतका वाढला आहे. दर आठवड्याला सरासरी १० जणांना अपघातात प्राण गमवावे लागत असून ३१ जण जायबंदी होत आहेत.

खड्डेमय तसेच खराब रस्ते किंवा रस्त्यावर आवश्यक उपायोजना न करणे, वर्षानुवर्षे रस्त्याची कामे रखडणे, सूचनांचे फलक नसणे आदी अनेक कारणांमुळे रस्ते अपघात होत



असतात. तसेच अपघातास चालकांची चूकही कारणीभूत असल्याचे दिसून येते. अनेकदा चालक मद्यप्राशन करून गाडी चालवतात. तसेच क्षमतेपेक्षा मालाची अधिक वाहतूक करणे, भरधाव वेगात गाडी चालवणे, गाडीच्या बाहेर माल बाहेर येणे, गाडीमधील तांत्रिक दोष असूनही दुर्लक्ष करणे यामुळेही रस्ते अपघातात वाढ होऊ लागली असून अपघात हकनाक मृत्यू होत आहेत. दरवर्षी रस्ता सुरक्षा अभियान राबवले जाते. मात्र सेलिब्रेटींपुरतेच मर्यादित असलेल्या या अभियनातून किती जनजागृती होते याबाबत प्रश्नचिन्ह आहे. अनेकदा रस्ता खराब झाल्यास तातडीने संबधित विभाग रस्त्याची दुरुस्ती करत नाहीत. पावसाळ्यात सर्वच ठिकाणी रस्त्यावर पडणाऱ्या खड्यामुळे अपघात होत असतात. त्यामुळे वर्षभरात देशभरात रस्ते अपघात बळी जाणाऱ्यांची संख्या मोठी असून महाराष्ट्रातही मोठ्या प्रमाणावर रस्ते अपघात होत आहेत. या गंभीर प्रश्नाची सर्वोच्च न्यायालयाने दखल घेत दरवर्षी रस्ते अपघातात १० टक्के घट करण्याचे निर्देश दिले आहेत. मात्र, प्रत्यक्षात अपघातांतील मृत आणि जखमींच्या संख्येत १० टक्क्यांपेक्षाही जास्त वाढ होत आहे.

# नाला बुजवणाऱ्या ठेकेदारांना अटक

**पारोळ** – वसई विरार महापालिकेच्या नवघर माणिकपूर एच प्रभागात येणाऱ्या दिवणमान येथील सूर्यागार्डन परिसरातून जाणाऱ्या खाजण जमिनीच्या वसई, नायगाव खाडीत जाणारा नाला महापालिकेच्या ठेकेदाराने बाजूला असलेल्या जमीन मालकाची परवानगी न घेता त्यात प्रवेश करून व त्यातील शेकडो ब्रास माती काढून बुजविला. हा प्रकार जमीन मालकाच्या सतर्कतेमुळे उघड झाला. या प्रकरणी संबधित ठेकेदारासह त्यांच्या दोन साथीदारांना शनिवारी पोलिसांनी अटक केली. मात्र त्यांना जामीन मंजूर झाला असून या प्रकरणात महापालिकेच्या संबंधित अधिकारीऱ्यावरही गुन्हा दाखल करण्यात आला असून या बाबत तपास चालू असल्याचे पोलीस अधिकारी बेग यांनी सांगितले.



वसई तील मौजे दिवणमान सर्व्हे न ६२ या जागेचे मालक अमृत कडुलकर आणि इतर असून त्यातून जेसीबीद्वारे मातीचे उत्खनन करून नैसर्गिक व खाडीपात्रात जाणारा नाला बुजवित असल्याची माहिती मिळाली तेव्हा कडुलकरांनी ते काम थांबवून तेथे असलेलेल्या ठेकेदाराला जाब विचारला असता सुरू असलेले काम पालिकेचे असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांनी पोलिसांसह महापालिकेच्या अधिकाऱ्यांना बोलावून जाब विचारला असता तर आम्हाला खाडीवर रुंद पूल बांधण्याचा ठेका दिल्याचे त्यांनी सांगितले. तर या ठेकेदाराने शेतातून माती काढून नाला बुजवल्याचे निदर्शनास आणून दिले. जमीन मालकाने नोंदविलेल्या फिर्यादीनुसार या प्रकरणी माणिकपूर पोलिसांनी बालाजी कन्स्ट्रक्शन चा मुख्य ठेकेदार बबन मोहिते, जेसीबी चालक शिव निषाद व त्या कामाचा ठेकेदार सुनील नाईक यांना अटक केली.

# कचरा टाकणाऱ्यांकडून केला वसईत १३ लाखांचा दंड वसूल

**वसई** – या शहरात कचरा टाकून परिसर अस्वच्छ करणाऱ्या नागिरकांविरोधात महापालिकेने स्वच्छतादूतांच्या माध्यमातून पुन्हा दंडात्मक कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. मध्यंतरी ही कारवाई बंद करण्यात आली होती. वसई-विरारमध्ये महिन्याभरात तेरा लाखांचा दंडही वसूल करण्यात आला आहे.

शहरात कचरा टाकणाऱ्या तसेच इतर अनेक मार्गाने शहर अस्वच्छ करणाऱ्यांना वचक बसविण्यासाठी या शहरात महानगरपालिकेने स्वच्छतादूतांची (क्लिनअप मार्शल) नेमणूक केली आहे. यासाठी महानगरपालिकेने प्रस्ताव मंजूर करून २०१८ ते २०२१ या तीन वर्षांसाठी चार कंपन्यांना ठेका दिला आहे. १० नोव्हेंबर २०१८ रोजी स्वच्छतादूतांचे काम सुरू झाले. शहरातील सार्वजनिक ठिकाणे, रस्ते, रुग्णालये, शाळा, महाविद्यालये, बाजारपेठा, धार्मिक स्थळे अशा विविध ठिकाणी कारवाई करण्यास सुरुवात करण्यात आली. त्यांनी महिन्याभरात १३ लाखाचा दंड वसूल केला आहे. यामध्ये रस्त्यावर थुंकणे, कचरा करणे, वाहनातून कचरा टाकणे, सार्वजनिक ठिकाणी मलमूत्र विसर्जन करणे अशा गुन्ह्यद्रांचा समावेश आहे. सध्या



महानगरपालिकेतील ९ प्रभागात ही मोहिम सुरू करण्यात आलेली आहे. प्रत्येक प्रभागात १० असे ९ प्रभागात मिळून ९० स्वच्छतादूतांची नेमणूक केलेली आहे. या चार कंपन्यांना वसूल केलेल्या दंडातील ३० टक्के रक्कम कमीशन म्हणून देण्यात येणार आहे. यातील ७० टक्के महापालिकेला मिळणार आहेत. या दंडाची छापील पावती संबंधीताला दिली जाणार आहे.

# मला भावी मुख्यमंत्री म्हणू नका, त्यामुळंच माती झाली आहे



खुमासदार शैलीत भाषण करण्यासाठी प्रसिद्ध असलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि माजी उपमुख्यमंत्री अजित पवार हे आपल्या स्पष्टवक्तेपणासाठीही प्रसिद्ध आहेत. कार्यकर्त्यांनी आपल्याला भावी मुख्यमंत्री किंवा शरद पवार यांचा भावी पंतप्रधान म्हणून उल्लेख करु नये असे आवाहन त्यांनी बारामती येथे आयोजित एका कार्यक्रमात कार्यकर्त्यांना उद्देशून केले. आधी राष्ट्रवादी आणि काँग्रेस आघाडीचे बहुमत कसे मिळेल याकडं लक्ष दिलं पाहिजे. पदांच्या उल्लेखामुळेच पाडापाडीचे राजकारण होते आणि या पाडापाडीमुळेच आमची माती झाली आहे, असं ते म्हणताच उपस्थितांमध्ये एकच हशा पिकला. एका स्थानिक नेत्याने आपल्या भाषणात अजित पवार यांचा उल्लेख भावी मुख्यमंत्री म्हणून केला होता. तोच धागा पकडून अजित पवार यांनी कार्यकर्त्यांना असा उल्लेख न करण्याची विनंती केली.


भावी मुख्यमंत्री म्हटल्याने कोणाच्या भावना दुखावल्या जातात किंवा कोणाला पसंत पडत नाही. त्यातून पाडापाडी होऊ शकते. त्यामुळं यापुढं असं काहीही म्हणू नका आणि आघाडीला बहुमत कसं मिळवता येईल याकडे सर्वांनी लक्ष द्यावं, असे ते म्हणाले. वृत्तवाहिन्यांच्या कॅमे[illegible]याकडे पाहत ते म्हणाले, अजित पवार काय बोलतात यावरच लक्ष असतं यांचं..अटेंशन.. ब्रेकिंग न्यूज.. असं त्यांनी म्हणताच उपस्थितांनी त्यांना हसून दाद दिली. यावेळी त्यांनी माजी खासदार निवेदिता माने यांच्या शिवसेना प्रवेशाविषयीही भाष्य केले. कोणी काय करावं हा ज्याचा-त्याचा प्रश्न असल्याचे ते म्हणाले. यावेळी त्यांनी शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावरही टीका केली. जनतेच्या महत्त्वाच्या प्रश्नांवर सरकार थातूर मातूर उत्तरं देत आहे. पाच राज्यातील निवडणूक निकालात भाजपाची पिछेहाट झालीय. त्यामुळे कर्जमाफी देऊन गमावलेला जनाधार मिळवण्याचा केविलवाणा प्रयत्न भाजपाकडून सुरु असल्याचीही टीका त्यांनी केली.

## कर्नाटकात साखर कारखान्यात स्फोट; ६ ठार

**बेंगळुरू** – बागलकोट जिल्ह्यातील मुधोल येथील साखर कारखान्यात बॉयलरचा स्फोट झाला. या दुर्घटनेत सहा जणांचा मृत्यू झाला असून, पाच जण जखमी झाले आहेत. घटनास्थळी अग्निशमन दलाच्या गाड्या पोहोचल्या असून, स्थानिक प्रशासनानं बचावकार्य हाती घेतलं आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मुधोलमधील निरानी शुगर्स लिमिटेडमध्ये बॉयलरचा स्फोट झाला. यात सहा जणांचा मृत्यू झाला असून, पाच जण गंभीर जखमी झाले आहेत. स्फोटाची तीव्रता अधिक असल्यानं कारखान्याची तीन मजल्याची इमारत कोसळली. ज्या ठिकाणी स्फोट झाला तेथे दहा ते बारा कामगार होते, अशी माहिती आहे.

# आता ओला-उबेरप्रमाणे ॲम्ब्युलन्सही बुक करता येणार

**नवी दिल्ली-** ओला, उबेरप्रमाणे आता एखाद्या रुग्णाला तातडीने रुग्णालयात न्यायाचे असेल, तर रुग्णवाहिकाही ॲम्ब्युलन्स ॲपच्या माध्यमातून बुक करता येईल. केंद्र सरकार यावर गंभीरपणे विचार करत आहे. यासाठी सरकार सर्व खासगी रुग्णवाहिकांना एका छत्राखाली आणणार असून, प्रारुप आता देशभरात लागू करण्याचा विचार सरकार करत आहे. त्यासाठी केंद्रीय कुटुंब कल्याण मंत्रालयाने योजनाही तयार केली आहे. आरोग्य मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव आणि राष्ट्रीय आरोग्य मोहिमेचे मुख्य व्यवस्थापक मनोज झालानी म्हणाले की, ओला-उबेरप्रमाणेच आता रुग्णवाहिकाही ॲप आधारित करण्यात येणार आहेत. तुमच्याकडील मोबाईलच्या माध्यमातून तुम्ही त्याचे बुकिंग करू शकता. त्याचबरोबर फोनच्या माध्यमातूनही बुकिंग करता येईल.




त्यांना प्रत्येक फेरीनंतर त्याचे पैसे दिले जाणार आहेत. नव्याने रुग्णवाहिका घेण्यापेक्षा आहे त्याच रुग्णवाहिकांचा परिणामकारक वापर करण्यासाठी केंद्र सरकारने ही योजना आखली आहे. त्याचबरोबर यापुढे रुग्णवाहिका न घेण्याचा निर्णयही सरकारने केला आहे.

रुग्णवाहिकाही ओला-उबेरप्रमाणे ॲपआधारित चालविण्याचा प्रयोग सर्वप्रथम देशात आंध्र प्रदेश येथे लागू करण्यात आला. त्याला चांगला प्रतिसाद मिळाला. त्यामुळे हेच यामुळे सर्व रुग्णवाहिकांमध्ये समन्वय ठेवणे सरकारला शक्य होणार आहे.

सध्या एखादी नवी रुग्णवाहिका विकत घ्यायची म्हटली तर १२ ते २० लाख रुपये खर्च येतो. याशिवाय चालक आणि वैद्यकीय पथक सोबत ठेवायचे म्हटले तर त्यासाठी वेगळा प्रतिमहिना ४० हजार रुपये खर्च होतो. यातून बचत करण्यासाठी खासगी रुग्णवाहिकांचा पुरेपूर वापर करण्यासाठी सरकारने हा निर्णय घेतला आहे.

# काँग्रेसने देशाला दिला सर्वात श्रीमंत मुख्यमंत्री!

दोन दिवस झालेली खलबतं आणि चर्चेनंतर अखेर मध्य प्रदेशमधील मुख्यमंत्र्यांच्या नावाची घोषणा झाली आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि प्रदेशाध्यक्ष कमलनाथ मध्य प्रदेशचे नवे मुख्यमंत्री असणार आहेत. अद्याप त्यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली नसली तरी त्यापूर्वीच



त्यांनी श्रीमंतीच्या बाबतीत आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांना मागे टाकलं आहे. 'आज तक'ने दिलेल्या वृत्तानुसार, कमलनाथ आता देशातील सर्वात श्रीमंत मुख्यमंत्री ठरणार आहेत.

या वृत्तानुसार, २०१४ लोकसभा निवडणुकांसाठी निवडणूक आयोगाला दिलेल्या प्रतिज्ञापत्रात कमलनाथ यांनी आपल्याकडे एकूण २०६ कोटी रुपये संपत्ती असल्याची माहिती दिली होती. या प्रतिज्ञापत्रात त्यांच्यावर ५ कोटी रुपयांचं कर्ज असल्याचंही म्हटलं आहे. कमलनाथ यांच्याकडे २ कार असून यातील एक दिल्लीमध्ये नोंदणी असलेली ॲम्बेसडर क्लासिक कार आहे, तर एक मध्य प्रदेशची नंबर प्लेट असलेली सफारी स्टॉर्म एसयुव्ही आहे. या गाड्यांची एकूण किंमत १९ लाख रुपये सांगण्यात आलं आहे. यापूर्वी सप्टेंबर २०११ मध्ये २७३ कोटी रुपये संपत्तीसह त्यांना देशातील सर्वात श्रीमंत कॅबिनेट मंत्री म्हणून घोषीत करण्यात आलं होतं.

त्यापूर्वी फेब्रुवारी २०१८ च्या एडीआर अहवालानुसार असोसिएशन फॉर डेमोक्रेटिक रिफॉर्म्स देशातील सर्वात श्रीमंत मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू होते. आंध्र प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांकडे एकूण १७७ कोटी रुपयांची संपत्ती आहे. तर दुसऱ्या क्रमांकावर अरुणाचल प्रदेशचे मुख्यमंत्री प्रेम खांडू हे होते. खांडू यांच्याकडे १२९.५७ कोटी रुपयांची संपत्ती आहे. कमलनाथ यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर खांडू तिसऱ्या क्रमांकावर जातील. याशिवाय देशातील श्रीमंत मुख्यमंत्र्यांमध्ये अनुक्रमे पंजाबचे मुख्यमंत्री कॅप्टन अमरिंदर सिंह ( ४८.३१ कोटी रुपये) आणि तेलंगणचे मुख्यमंत्री चंद्रशेखर राव (१५.५१ कोटी रुपये) आहे.

# मेहुल चोक्सीविरोधात इंटरपोलची रेड कॉर्नर नोटीस

**नवी दिल्ली-** पंजाब नॅशनल बँकेतील घोटाळा प्रकरणी विदेशात पळून गेलेला हिऱ्यांचा व्यापारी मेहुल चोक्सी याच्याविरोधात इंटरपोलने रेड कॉर्नर नोटीस जारी केली आहे. केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाच्या सीबीआय विनंतीनंतर ही नोटीस जारी करण्यात आली आहे. याच बँकेला कोट्यवधींचा चुना लावून विदेशात पळालेला हिरे व्यापारी नीरव मोदीचा मेहुल चोक्सी हा मामा आहे. सीबीआयच्या विनंतीवरून इंटरपोलने मेहुल चोक्सी याच्याविरोधात रेड कॉर्नर नोटीस बजावली आहे, असे सीबीआयचे प्रवक्ते अभिषेक दयाल यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले. पंजाब नॅशनल बँकेतील




१३,५०० कोटी रुपयांच्या घोटाळ्यातील सूत्रधार नीरव मोदी, मेहुल चोक्सी आणि अन्य आरोपी परदेशात पसार झाले आहेत. मेहुल चोक्सी हा सध्या अँटिग्वा येथे असून प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्याला भारतात परतणे तूर्तास शक्य नाही, अशी माहिती मेहुल चोक्सीच्या वकिलांनी नोव्हेंबरमध्ये न्यायालयात दिली होती. त्याचबरोबर विजय मल्ल्याप्रमाणे चोक्सीनेही भारतीय तुरुंगातील अव्यवस्थेचे कारण पुढे करत या प्रकरणी सीबीआयने केलेल्या दाव्याला न्यायालयात आव्हान दिले होते. मेहुल चोक्सीविरोधात रेड कॉर्नर नोटीससंदर्भात सीबीआयने इंटरपोलला विनंती केली होती.

# डॉ. नरेंद्र दाभोलकर हत्या प्रकरणातील आरोपींना जामीन मंजूर

**पुणे-** डॉ. नरेंद्र दाभोलकर हत्या प्रकरणातील आरोपी अमोल काळे, अमित दिगवेकर आणि राजेश बंगेरा यांना पुणे सत्र न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. सीबीआयने ९० दिवसात दोषारोपपत्र दाखल न केल्याने आणि सीबीआयचे वकिल आज अनुपस्थित असल्याने कोर्टाने जामीन मंजूर केला आहे.

सीबीआयचे तपास अधिकारी दिल्लीतील कामांमध्ये व्यस्त आहेत त्यामुळे आम्हाला २० डिसेंबरपर्यंत वाढीव मुदत द्यावी अशी मागणी सीबीआयकडून करण्यात आली होती. मात्र पुणे सत्र न्यायालयाने सीबीआयची मागणी फेटाळून लावली. तिघांच्या अटकेला ९० दिवस पूर्ण झाल्याने बुधवारी या तिघांच्या वकिलांनी जामिनासाठी कोर्टात अर्ज दाखल केला होता.



अमोल काळे, अमित दिगवेकर आणि राजेश बंगेरा या तीनही आरोपींविरुद्ध यु. ए. पी. ए कायद्याअंतर्गत कारवाई करण्यात आली होती. दहशतवादी कृत्य केल्याचा आणि देशाविरुद्ध युद्ध पुकारल्याचा त्यांच्याविरुद्ध आरोप ठेवण्यात आला होता. त्यामुळे सीबीआयने दोषारोपपत्र दाखल करण्यासाठी केवळ एक अर्ज जरी दाखल केला असता तरी न्यायालयाने जामीन अर्ज फेटाळून लावला असता. मात्र सीबीआयकडून ते देखील करण्यात आले नाही.

पुणे सत्र न्यायालयाने जामीन मंजूर केला असला तरी हे तीनही आरोपी लगेच तुरुंगातून सुटणार नाहीत. कारण अमोल काळे हा सध्या गोविंद पानसरे यांच्या हत्येप्रकरणी कोल्हापूर एसआयटीच्या ताब्यात आहे तर राजेश बंगेरा आणि अमित दिगवेकर हे दोघे गौरी लंकेश आणि एम. एम कलबुर्गी यांच्या हत्येप्रकरणी कर्नाटक एसआयटीच्या ताब्यात आहेत.

अमोल काळे हा चारही हत्याप्रकरणांमध्ये मास्टरमाईंड आहे. चारही हत्यांचा कट आखण्याची जबाबदारी त्याच्यावर होती. राजेश बंगेराने कर्नाटकातील जंगलांमध्ये मारेकऱ्यांना शस्त्र चालवण्याचं प्रशिक्षण दिल्याचा आरोप आहे तर अमित दिगवेकर हा दाभोलकर हत्येसाठी रेकी करण्यात सहभागी होता.

## मोबाईल नंबर पोर्ट करणे झालं आणखी सोपं

मोबाईल नेटवर्कमुळे त्रस्त असाल तर नंबर पोर्ट करायला हरकत नाही. कारण नंबर पोर्ट करण्याची कटकटीची प्रक्रिया आता झटपट होणार



आहे. कंपन्याकडून होणाऱ्या दिरंगाईला लगाम लावत दूरसंचार नियामक आयोगाने नवीन नियम लागू केले असून, पोर्टेबिलीटीच्या रिक्वेस्टवर दोन दिवसांत कारवाई करण्याचे आदेश ट्रायने दिले आहेत. विशेष म्हणजे पोर्टेबिलीटीची तक्रार ठोस कारणांशिवाय नाकारल्यास सेवा देणाऱ्या संबंधित कंपनीला दहा हजार दंड द्यावा लागणार आहे.

गेल्या काही दिवसांत मोबाईलधारकांच्या अडचणी नेटवर्कने भर टाकली आहे. त्यामुळे अनेकांचा कल नंबर पोर्टेबिलीटी करण्याकडे असतो. मात्र, या प्रक्रियेत मोबाईल कंपन्याकडून दिरंगाई होत असल्याने अनेकांना विनाकारण त्रास सहन करावा लागतो. मोबाईल ग्राहकांची अडचण ट्रायने हेरली असून, मोबाईल नंबर पोर्टेबिली प्रक्रियेत महत्त्वाचे बदल करण्याचे आदेश टेलिकॉम कंपन्यांना दिले आहेत. एकाच सर्कलमधील मोबाईल नंबर पोर्टेबिलीटीच्या रिक्वेस्टवर दोन दिवसात, तर दोन वेगवेगळ्या सर्कलमधील मोबाईल नंबर पोर्टेबिलीटीच्या रिक्वेस्टवर चार दिवसात कारवाई करावी, असे ट्रायने बजावले आहे.


तसेच एखाद्या ग्राहकाची मोबाईल पोर्टेबिलीटीची रिक्वेस्ट कंपनी कोणतेही ठोस कारण न देता फेटाळून लावत असेल तर याचा भूर्दंड कंपनीला भरावा लागणार आहे. यासाठी कंपनीला दहा हजार रुपये दंड आकारण्यात येणार आहे.

# राहुल देशाची आणि सैनिकांची माफी मागा -अमित शहा

**नवी दिल्ली - राफेल करारावरून देशभरातून चौफेर टीकेला सामोरे गेलेल्या केंद्र सरकारला आज मोठा दिला मिळाला. सर्वोच्च न्यायालयाने राफेल कराराला आव्हान देणाऱ्या सर्व याचिका निकालात काढत फेटाळून लावल्या. काँग्रेस अध्यक्ष राहुल गांधी यांनी राफेल करारावरून केंद्र सरकारवर कडाडून प्रहार केला होता.**

राफेल करार विरोधातील याचिका फेटाळण्यात आल्याने भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष अमित शहा यांनी आता राहुल यांनी देशाची आणि सैनिकांची माफी मागावी अशी मागणी केली. सर्वोच्च न्यायालयाने चुकीची माहिती देशाला देण्याचा पर्दा फाश केला असल्याचे शहा म्हणाले. राफेल मुद्यावरून भाजप चर्चेला तयार असल्याचे त्यांनी सांगितले. संसदेत या मुद्यावर चर्चा करण्यासाठी शहा यांनी काँग्रेसला आव्हान दिले.

शहा म्हणाले की, मी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे स्वागत करतो, सत्याचा विजय झाला आहे. लोकांना चुकीची माहिती देण्याचा उद्योग झाला. राहुल यांनी देशाची आणि सैनिकांची माफी मागितली पाहिजे. त्यांनी देशाची सुरक्षा धोक्यात घातली. चौकीदार चोर आहे, असे म्हणत चोर एकत्र झाले होते, पण देशाने कधीच त्याच्यावर विश्वास ठेवला नाही. कोणत्या आधारावर राहुल यांनी राफेल करारावर चुकीचे आरोप लावले त्याचा आता तपशील दिला पाहिजे, असेही शहा म्हणाले. सर्वोच्च न्यायालयानेही उप कंत्राटदार निवडण्यात कोणतीही चुक झाली नसल्याचे स्पष्ट केल्याचे शहा यांनी सांगितले.



पृष्ठ १ वरुन

# ठाणे येथे पोलीस मुख्यालयात पोलिसांसाठी आश्रय ट्रस्टतर्फे मोफत आरोग्य शिबिर संपन्न













यांच्याकडून करण्यात आली. विविध पोलिस स्टेशनचे अधिकारी वर्ग व पोलिस या शिबिरात उपस्थित होते. नेत्र तपासणी केल्यावर पोलिसांना चष्मे अल्प दरात देण्यात आले. यावेळी आश्रय ट्रस्टचे संस्थापक दिपक मोरेश्वर नाईक यांनी प्रत्येक पोलिस स्टेशनला आम्ही शिबिर लावू असे जाहिर केले आहे. ठाणे पोलिस निरिक्षक अनिल पवार यांनी या शिबिरासाठी जागा उपलब्ध करु न दिली. व स्वतः राखीव पोलिस निरिक्षकम्हादेव गडदे यांच्याबरोबर संपूर्ण वेळ शिबिरात उपस्थित राहून आश्रय ट्रस्टच्या सहकाऱ्यांना व डॉक्टरांना सहकार्य केले. वेळोवेळी असे शिबिर आपण घ्यावे यामुळे सर्वांना त्याचा लाभ घेता येईल असे राखीव पोलिस निरिक्षक महादेव गडदे यांनी सुचवले. या शिबिरासाठी पोलिस बातमी पत्रचे पत्रकार , छायाचित्रकार तसेच सोशल राईट्स फाऊडेशनचे कार्यकर्ते उपस्थित होते. संस्कार सेवा संस्था यांच्यातर्फेअल्प दरात चष्मे वाटप करण्यात आले. मनराज प्रतिष्ठान च्या वतीने मोफत औषधे वाटण्यात आली.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं.३-४, अमीन इंडस्ट्रियल इस्टेट, सोनावला क्रॉस रोड नं.४, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को.ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)